नियमित फौजदारी खटला क्र २५७/२०१७ निशाणी क्र. ६७

<u>साक्षीदार क्र.२ चा शपथेवर जबाब.</u>

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** – मनसुर अहमद शेख,

**वय सुमारे** – ५२ वर्षे, उपजिवीका –सहाय्यक फौजदार

**नेमणूक** – श्रीरामपूर तालुका पोलिसस्टेशन

<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती पी.आर. धुमाळ यांचे मार्फत</u>

१ दिनांक १४.०४.२०१६ रोजी मी श्रीरामपूर शहर पोलिस ठाणे येथे पोलिस नाईक म्हणून कार्यरत असताना वरिष्ठ सहाय्यक उपाधिक्षक ओला पोलिसठाण्यात आले होते व त्यांनी आम्हाला कळविले की, गोंधवणी गावात एक इसम बनावटी दारु तयार करुन विक्री करत आहे. वरिष्ठ पोलिस निरीक्षक दळवे यांनी दोन पंचांना बोलावुन घेतले व त्यांना छाप्याची माहिती देवून कारवाई करण्याचे आदेश दिले.

२. त्यानंतर आम्ही १३.२० मिनीटांनी खाजगी वाहनाने मी, हापसे, वरिष्ठ दळवे, साळवे व दोन पंचांसह मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी गोंधवणी येथे पोलिस ठाण्यातुन रवाना झालो. १३.४० मिनीटांनी आम्ही गोंधवणी येथे पोहोचलो असता एक बंद खोलीमध्ये एक इसम काचेच्या वेगवेगळया बाटल्यांमध्ये काही द्रव्य भरत असताना दिसले. आम्ही दार वाजवले. त्या इसमाने दार उघडले त्या इसमाला आम्ही आमचा परिचय दिला. त्या इसमाला नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव महेश माधव गायकवाड असे सांगितले. आम्ही पंचांसमक्ष घटनास्थळाची झडती घेतली. तेव्हा तिथे काचेच्या बाटल्यांना वेगवेगळया दारुचे लेबल लावलेले दिसले. आरोपीकडे आम्ही चौकशी केली असता आरोपी क्र. १ ने बंटी आछाडा आरोपी क्र. २ चे नाव सांगितले. वरिष्ठ दळवे यांनी घटनास्थळी सर्व मुद्देमाल जप्त करुन पंचनामा केला.घटनास्थळी आम्हाला बनावट दारु सुध्दा मिळुन आली. आरोपींना पाहिल्यास मी ओळखु शकतो. आरोपींची गैरहजेरी निशाणी ६५ व ६६ वर लावण्यात आलेली आहे.

**सरतपास पुर्ण .**

<u>उलटतपास आरोपीं तर्फे विधिज्ञ श्री. ए.जी शेख यांचेकडून सुरु</u>

हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी जाण्याच्या आधी तपासीअंमलदार यांनी स्टेशनडायरीला नोंद केली असेल. माझ्या समक्ष नोंद झाली आहे. खाजगी वाहनाचा तपशील मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळ लोकवस्तीचे असुन तिथे बरीच घरे

आहेत. घटनास्थळी आरोपीचा कोणताही जबाब नोंदविलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपी आरोपी क्र. १ ने बंटी आछाडा आरोपी क्र. २ चे नाव सांगितले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितल्या प्रमाणे घटनास्थळावरुन मुद्देमाल जप्त करण्यात आलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की वरीष्ठांनी सांगितल्यामुळे आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की आज खोटी साक्ष देत आहे.

**आरोपी क्र. ३ तर्फे विधीज्ञ श्रीमती आठरे यांनी वरील उलटतपास मान्य केला**.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती.....

Digitally signed by VIJAYA NARAYANRAO KATKAR
Date: 2026.05.08 15:22:18 +0530

(काटकार विजया एन.एस.)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
श्रीरामपूर

दिनांक –०८.०५.२०२६